"स्वच्छतेतून समृद्धीचा ध्यास हाच आमचा ग्रामविकास"
निर्मल ग्राम तंटामुक्त ग्राम, पर्यावरण ग्राम पुरस्कार प्राप्त

ग्रामपंचायत जावली

एक पाऊल स्वच्छतेकडे

ता. महाबळेश्वर जि. सातारा.

१) झाडे लावा, झाडे जगवा. २) ग्रामपंचायतीचा कर वेळेवर भरा.
३) सार्वजनिक स्वच्छता ही प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. ४) प्लास्टिकचा वापर टाळा, पर्यावरणाचा ऱ्हास टाळा.

जावक क्रमांक : दिनांक : / /२० .

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो.
मे.साईओ इन्फ्रा, कोल्हापूर

विषय : वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत मौजे हरोशी ता.महाबळेश्वर जि.सातारा येथील (सर्व्हे नं.२० व फॉरेस्ट कक्ष क्र.१०१) मधील वनक्षेत्रातील प्रस्तावित महाप्रताप हवाई रज्यु मार्ग प्रकल्पासाठी ग्रामसभेची परवानगी मिळणे बाबत.

संदर्भ : १.आपला अर्ज दि.०३/१२/२०१८ क्र.साईओ इन्फ्रा/ग्रामसभा/१६/२०१८
२.आपला अर्ज दि.०३/१२/२०१८क्र.साईओ इन्फ्रा/एन.ओ.सी./२१/२०१८

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय विषयान्वये महाप्रताप हवाई रज्यु मार्ग प्रकल्पासाठी आवश्यक जागा वळतेकरणासाठी अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ अंतर्गत मागणी केलेला संदर्भिय अर्ज क्र.१ जावली ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यानुसार ग्रामसभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चा करण्यात आली त्यानुसार घेण्यात आलेला निर्णय पुढीलप्रमाणे.

वरील विषयावर ग्रामसभेमध्ये मे.साईओ इन्फ्रा, कोल्हापूर यांचेवतीने श्री.एन.एस.चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मौजे जावली ता.महाबळेश्वर जि.सातारा सर्व्हे नं.२० व फॉरेस्ट कक्ष क्र.१०१ मधील वनक्षेत्र १ हेक्टर ५९.५ आर हे महाप्रताप हवाई रज्यु मार्ग प्रकल्पासाठी परवानगी मिळणेबाबत वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव तयार केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मागणी केलेल्या वनजमिनीवर आदिवासी व जंगलवासी कायदा २००६ अंतर्गत सदर वनजमिनीवर कोणाचेही हक्क व दावे नाहीत. सदर हवाई रज्यु मार्ग प्रकल्पासाठी लागणाऱ्या वन जमिनीच्या वळतेकरणास ग्रामसभेने मान्यता दिली असून तसा ठराव पारित करण्यात आलेला आहे. तो सोबत जोडत आहे. तसेच संदर्भिय क्र.२ नुसार प्राप्त अर्जावर देखील ग्रामसभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेस आपण स्वतः उपस्थित होता. त्यानुसार संपूर्ण प्रकल्पाला काही अटी व शर्तीवर ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबतचा ठराव पारित झाला असून मागणी केलेल्या अटी व शर्तीचा लेखी करारनामा ग्रामपंचायतीशी करण्यात यावा. त्यानंतर या प्रकल्पासाठी आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. तरी आपले स्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाही होणेस विनंती असे.

आपला विश्वासू

Gaikwad
ग्रामसेवक
ग्रामपंचायत जावली
ता. महाबळेश्वर जि. सातारा

V S Otekar
सरपंच
ग्रामपंचायत जावली
ता. महाबळेश्वर जि. सातारा

सोबत : ग्रामसभा दि.२६/०१/२०१९ चे ठरावाची प्रत

Scanned by CamScanner

ग्रामपंचायत जावली

ग्रामसभा ठराव दि.२६/०१/२०१९

ठरावाची नक्कल

विषय क्र.१० : मौंजे हरोशी ता.महाबळेश्वर जि.सातारा येथील (सर्व्हे नं.२० व फॉरेस्ट कक्ष क्र.१०१) मधील वनक्षेत्रातील प्रस्तावित महाप्रताप हवाई रज्जु मार्ग प्रकल्पासाठी ग्रामसभेंची परवानगी मिळणे बाबत.

ठराव क्र.१० :मौंजे जावली ता.महाबळेश्वर जि.सातारा या ग्रामपंचातीच्या आजच्या ग्रामसभेमध्ये सर्व्हे नं. २० व फॉरेस्ट कक्ष क्र. १०१ मधून महाप्रताप हवाई रज्जु मार्ग प्रकल्पासाठी परवानगी मिळणेबाबतचा अर्ज मे. साईओ इन्फ्रा. कोल्हापूर यांचेवतीने श्री.एन.एस.चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अर्ज प्राप्त झाला आहे. सदर अर्ज ग्रामसभेमध्ये सविस्तर वाचून दाखविण्यात आला. सदर विषयाच्या अनुषंगाने ग्रामसभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चा करण्यात आली त्यानुसार घेण्यात आलेला निर्णय पुढीलप्रमाणे.

वरील विषयावर ग्रामसभेमध्ये मे. साईओ इन्फ्रा, कोल्हापूर यांचे वतीने श्री.एन.एस.चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मौजे जावली ता.महाबळेश्वर जि. सातारा सर्व्हे नं. २० व फॉरेस्ट कक्ष क्र. १०१ मधील वनक्षेत्र १ हेक्टर ५९.५ आर हे महाप्रताप हवाई रज्जु मार्ग प्रकल्पासाठी परवानगी मिळणेबाबत वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव तयार केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मागणी केलेल्या वन जमिनीवर आदिवासी व जंगलवासी कायदा २००६ अंतर्गत सदर वनजमिनीवर कोणाचेही हक्क व दावे नाहीत. सदर हवाई रज्जु मार्ग प्रकल्पासाठी लागणाऱ्या वन जमिनीच्या वापराबाबत ग्रामपंचायत जावली यांची कोणतीही हरकत नाही. असे सर्वानुमते ठरविणेत आले असून त्यास ग्रामसभा सर्वानुमते मान्यता व मंजूरी देत असे.

सूचक : श्री. तुकाराम अमृता मोरे

अनुमोदक : श्री. आनंदा धोंडीबा उतेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

येणेप्रमाणे ठरावाची खरी नक्कल असे.

Gaikwad
ग्रामसेवक
ग्रामपंचायत जावली
ता. महाबळेश्वर जि. सातारा

VSUtekar
सरपंच
ग्रामपंचायत जावली
ता. महाबळेश्वर जि. सातारा

Scanned by CamScanner

ग्रा.क्र. [illegible]
२४/०४/२०१९

प्रति,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो.
मे.साईओ इन्फ्रा, कोल्हापूर

विषय : वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत मौजे कुंभरोशी ता.महाबळेश्वर जि.सातारा येथील (सर्व्हे नं.४९ व २३ व फॉरेस्ट कक्ष क्र. ९६ व ९७) मधील वनक्षेत्रातील प्रस्तावित महाप्रताप हवाई रज्यु मार्ग प्रकल्पासाठी ग्रामसभेची परवानगी मिळणे बाबत व महाप्रताप हवाई रज्यु मार्ग प्रकल्पासाठी ना हरकत दाखल्याबाबत...

संदर्भ :१.आपला अर्ज दि.०३/१२/२०१८ क्र.साईओ इन्फ्रा /ग्रामसभा/१८/२०१८
२.आपला अर्ज दि.०३/१२/२०१८क्र.साईओ इन्फ्रा/एन.ओ.सी./२०/२०१८

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय विषयान्वये महाप्रताप हवाई रज्यु मार्ग प्रकल्पासाठी आवश्यक जागा वळतेकरणासाठी अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ अंतर्गत मागणी केलेला संदर्भिय अर्ज क्र.१ कुंभरोशी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यानुसार ग्रामसभेत सविस्तर **चर्चा करण्यात आली. चर्चा करण्यात आली त्यानुसार घेण्यात आलेला निर्णय पुढीलप्रमाणे.**

वरील विषयावर ग्रामसभेमध्ये मे.साईओ इन्फ्रा, कोल्हापूर यांचेवतीने श्री.एन.एस.चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मौजे कुंभरोशी ता.महाबळेश्वर जि.सातारा सर्व्हे नं.४९ व २३ व फॉरेस्ट कक्ष क्र.९६ व ९७ मधील वनक्षेत्र १ हेक्टर ७९ आर हे महाप्रताप हवाई रज्यु मार्ग प्रकल्पासाठी परवानगी मिळणेबाबत वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव तयार केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मागणी केलेल्या वनजमिनीवर आदिवासी व जंगलवासी कायदा २००६ अंतर्गत सदर वनजमिनीवर कोणाचेही हक्क पडताळणी करूण घेण्यात यावी **सदर हवाई रज्यु मार्ग प्रकल्पासाठी लागणाऱ्या** वन जमिनीच्या वळतेकरणास तुर्तास ग्रामसभेने स्थगिती दिली असून तसा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

तसेच संदर्भिय क्र.२ नुसार प्राप्त अर्जावर देखील ग्रामसभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेस आपण स्वतः उपस्थित होता. त्यानुसार संपूर्ण प्रकल्पाचा परिपूर्ण प्रकल्प अहवाल तसेच प्रकल्पाची संपूर्ण माहिती पी.पी.टी. द्वारे ग्रामसभेस दाखविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. या सभेत आपण स्वतः देखील उपस्थित होता. त्यानुसार संपूर्ण प्रकल्प अहवाल व पी.पी.टी.द्वारे ग्रामस्थांना प्रकल्पाची माहिती देण्यात यावी, जेणेकरुन ग्रामस्थांच्या मनातील सर्व शंकांचे निरसन होवून पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल. याबाबत आपले स्तरावर योग्य ती कार्यवाही होणेस विनंती असे.

आपला विश्वासू

Gaikwad
ग्रामसेवक
ग्रामपंचायत कुंभरोशी
जि. सातारा

सरपंच
ग्रामपंचायत कुंभरोशी